सराव

## १४. मिठाचा शोध

पाठावरील स्वाध्याय वहीत सोडवा.

### स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पूर्वीच्या काळी माणूस कुठे राहत असे ?
(आ) आदिमानवाने हरणांच्या कोणत्या गोष्टीचे खूप दिवस निरीक्षण केले ?
(इ) खनिज मिठाला आपण काय म्हणतो ?
(ई) माणसाने समुद्राचे पाणी कशात साठवले ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) बरेच दिवस त्यानं या गोष्टीचं ..............केलं. त्याला खूप ............ वाटलं.
(आ) कंदमुळं खाताना रोज थोडा थोडा .................. चाटू लागला.
(इ) त्याला दिसली एक वेगळ्या प्रकारची ............ .
(ई) ते पाणी त्याच्या ............... नेणंही त्याला शक्य होत नव्हतं.

**प्र. ३. का ते सांगा.**

(अ) आदिमानवाने दगड चाटून पाहिला.
(आ) समुद्राचे पाणी आदिमानवाच्या हातापायांना झोंबू लागले.
(इ) समुद्रकिनाऱ्यावर आदिमानवाने लांब खड्डा खणला.

हा पाठ ऐका लेखिका अंजली अत्रे मॅडम यांच्याच आवाजात खालील लिंकवर ....

व्हिडिओ पहा

टेस्ट सोडवा.

ऑनलाईन टेस्ट

विभाग दुसरा

# ९. शाब्दिक उदाहरणे : बेरीज – वजाबाकी

स्वाध्याय

१. बाबूरावांनी त्यांच्या मळ्यात मोसंबीची १४३ झाडे व चिकूची १५६ झाडे लावली, तर त्यांनी एकूण किती झाडे लावली ?

२. प्रियांकाने २४५ रुपयांची पुस्तके व १७८ रुपयांच्या वह्या खरेदी केल्या, तर तिने एकूण किती रुपयांची खरेदी केली ?

३. एका ग्रंथालयात गोष्टींची १,२३० पुस्तके व कवितांची १५० पुस्तके आहेत, तर त्या ग्रंथालयात एकूण किती पुस्तके आहेत ?

४. सर्कस पाहण्यासाठी १,३१० मुले, १,५०५ स्त्रिया व ७९० पुरुष आले होते, तर सर्कस पाहण्यासाठी कितीजण आले होते ?

५. अजयने एका बँकेत १८,००० रुपये आणि दुसऱ्या बँकेत १५,००० रुपये ठेवले, तर त्याने बँकांमधे एकूण किती रुपये ठेवले ?

**वरील शाब्दिक उदाहरणे सोडवा.टेस्ट सोडवा**

ऑनलाईन टेस्ट

Std – Fourth Sub – Maths (Semi)

Part Two

# 9. Word Problems: Addition and Subtraction

Exercise

(1) Baburao planted 143 sweet lime trees and 156 chikoo trees in his orchard. How many trees did he plant in all ?

(2) Priyanka bought books worth ₹ 245 and notebooks worth ₹ 178. How much did she spend altogether ?

(3) There are 1,230 story-books and 150 poetry books in a library. How many books are there in the library altogether ?

(4) If 1,310 children, 1,505 women and 790 men came to watch the circus, how many people came to watch the circus altogether ?

(5) Ajay deposited ₹ 18,000 in one bank and ₹ 15,000 in another. What is the total amount of money he deposited in the banks ?

**solve.**

## Word Building



**Use the letters to make words.**

अक्षरे वापरून शब्द बनवा.

| | | |
|---|---|---|
| s | t | n |
| c | a | d |
| p | b | m |

| | | |
|---|---|---|
| g | n | k |
| s | i | c |
| b | r | d |

| | | |
|---|---|---|
| f | h | s |
| l | e | t |
| b | g | n |

| | | |
|---|---|---|
| b | f | x |
| g | o | l |
| h | t | d |

| | | |
|---|---|---|
| n | t | r |
| s | u | c |
| p | h | k |

मागील घटकांवरील अपडेट होत असलेले सर्व व्हिडिओ पहा.

व्हिडिओ पहा

## १४. नकाशा आणि खुणा

### सांगा पाहू




वरील चित्रात अंजूचे घर व शाळेचा परिसर दिला आहे. चित्राच्या आधारे खालील कृती करा.

- चित्रातील अंजूचे घर शोधा.
- चित्रातील शाळा शोधा.
- अंजूच्या घरापासून शाळेपर्यंतचा मार्ग निवडा. तो वेगळ्या रंगाने गिरवा.
- या मार्गावरून शाळेत जाताना दिसणाऱ्या विविध गोष्टींची नोंद वहीत खालीलप्रमाणे करा.

अंजू ज्या रस्त्याने शाळेत जाणार आहे, तो मार्ग तुम्ही शोधला आहे. अंजूला शाळेत जाताना लहान रस्ता व मुख्य रस्ता लागेल. या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना वेगवेगळ्या गोष्टी/ठिकाणे आहेत.

(१) लहान रस्त्याने जाताना चित्रातील ठिकाणे कोणकोणत्या दिशांना येतात ते लिहा.

(२) मुख्य रस्त्याने जाताना चित्रातील ठिकाणे कोणकोणत्या दिशांना येतात ते लिहा.

(३) शाळेकडे जाताना कोणकोणत्या दिशांना वळावे लागले ते नोंदवा.

अंजूचे घर व परिसराचे चित्र छोट्या आकारात पुढे दिले आहे. या चित्रात मात्र खरोखरची झाडे किंवा इमारती दाखवल्या नाहीत. त्यांच्या जागी विशिष्ट खुणा दिल्या आहेत. तसेच वेगवेगळे रंगही वापरले आहेत. खुणांच्यापुढे त्या कशाच्या आहेत ते लिहिले आहे. परिसरातील काही गोष्टी या चित्रात आलेल्या नाहीत हे लक्षात घ्या.

**या चित्राला आराखडा म्हणतात.**

**आराखड्याचे निरीक्षण करा.**

ऑनलाईन टेस्ट

# १२. पुरंदरचा वेढा व तह

**मुरारबाजीचा अतुल पराक्रम :** दिलेरखानाला बघून मुरारबाजी चवताळला. 'कापा, तोडा, मुडदे पाडा', असे ओरडून तो शत्रूवर धावला. त्याची समशेर जोराने फिरू लागली. जो आड आला, तो ठार झाला. या एकट्या वीराला मुघलांनी चोहोकडून घेरले. इतक्यात दिलेरखान अंबारीतून ओरडला, ''थांबा!'' मुघल थांबले. क्षणभर मागे सरले. खान मुरारबाजीला म्हणाला, ''मुरारबाजी, तुझ्यासारखा समशेरबहाद्दर मी आजवर पाहिला नाही. तू आमच्या बाजूला ये, कौल घे. बादशाहा तुला सरदार करतील. जहागीर देतील, बक्षीस देतील!'' मुरारबाजीने दिलेरखानाचे शब्द ऐकले. रागाने त्याचे डोळे लाल झाले. तो चवताळून म्हणाला, ''अरे, आम्ही शिवाजी महाराजांची माणसे ! तुझा कौल घेतो की काय ? आम्हांला काय कमी आहे ? तुझ्या बादशाहाची जहागीर हवी कोणाला ?'' मुरारबाजीने खानाच्या दिशेने झेप घेतली आणि तो तुफान कत्तल करत सुटला. दिलेरखानाने अंबारीतून बाण सोडला. तो बाण थेट मुरारबाजीच्या कंठात शिरला. तो जमिनीवर कोसळला. मावळ्यांनी त्याचा देह उचलला आणि बालेकिल्ला गाठला. किल्लेदार पडला म्हणून त्यांना खूप दुःख झाले, पण 'एक मुरारबाजी पडला तरी काय झाले ? आम्ही तैसेच शूर आहो. हिंमत धरून लढतो', असे म्हणून ते न डगमगता पुन्हा निकराने लढू लागले.

ही बातमी शिवरायांना कळल्यावर ते फार दुःखी झाले. त्यांनी विचार केला, एकेक किल्ला वर्षवर्ष लढवता येईल, पण विनाकारण माणसे मरतील. शिवरायांना ते नको होते.

ऑनलाईन टेस्ट

सराव करा व प्रश्न बनवा. वाचा व समजून घ्या.

| इयत्ता चौथी - मराठी | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| 14. मिठाचा शोध | Click Here |
| 15. आनंदाचं झाड | Click Here |
| 16. झुळूक मी व्हावे | Click Here |
| 17. म्हणींच्या गमती | Click Here |
| **इयत्ता चौथी - गणित** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| शाब्दिक उदाहरणे-बेरीज वजाबाकी | Click Here |
| अपूर्णांक | लवकरच |
| मापन | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 1** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 14 नकाशा आणि खुणा | Click Here |
| 15. माझा जिल्हा माझे राज्य | लवकरच |
| 16. दिवस व रात्र | लवकरच |
| 17. माझी जडणघडण | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 2** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 12. पुरंदरचा वेढा व तह | Click Here |
| 13. बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या | लवकरच |
| 14. गड आला पण सिंह गेला | लवकरच |

**Subscribe**

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे | वेब स्त्रोत-'ई-बालभारती' | सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in